पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- २७/०३/२०२०*

मा. पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा़ो., यांचे मार्गदर्शनाखाली भामरागड पोलीस स्टेशन येथील अधिकारी व कर्मचारी यांचे तर्फे भंडारा जिल्ह्यातील भटक्या जमातीतील लोकांना अन्नधान्याचे व रोखरक्कमेचे वाटप करण्यात आले.

सदर भटकी जमात भंडारा जिल्हयातील असुन आपल्या कूटुंबाची उपजिवीका भागविण्यासाठी गावोगावी फिरुन गाणे म्हणणे, पंचांग पाहणे ईत्यादी कामे करुन गावातील लोकांनी दिलेल्या अन्नधान्य तसेच पैशातून आपल्या कूटूंबाची उपजिवीका भागवतात. मागील १५ दिवसांपूर्वी सदर जमातीतील लोक भामरागड तालूक्यात आपल्या कूटूंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी आले होते. परंतू जगभरात थैमान घातलेल्या कोरोना या संसर्गजन्य विषाणूचा प्रादूर्भाव भारतात दिसून आल्याने संपुर्ण महाराष्ट्रात संचारबंदी लागू झाली आहे. त्यामुळे भामरागड तालूक्यात प्रत्येक गावातील लोकांनी बाहेरगावचे लोकांसाठी संचारबंदी लागू केली आहे.

भामरागड तालूक्यात मागील १५ दिवसापूर्वी आलेल्या भंडारा जिल्ह्यातील भटक्या जमातीतील लोकांना दळणवळणाचे सर्व साधने बंद झाल्याने आपल्या गावाकडे परत जाता आले नाही. त्यामूळे कूटूंबाचा पोट कसे भरावे याची भान या लोकांना पडली होती. पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, पोलीस निरीक्षक श्री. संदीप भांड, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. गजानन पडळकर तसेच पोउपनि ज्ञानेश्वर झोल, मंगेश कराडे, किरण उघडे व भामरागड पोलीस स्टेशन मधील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी सदर भटक्या जमातीतील लोकांना तांदूळ,दाळ व रोख रक्कम देवून मदत केली आहे.

यावेळी पोलीसांनी दिलेल्या मदतीमुळे आमच्या पोटाच्या प्रश्न मिटल्याचे सांगत या सर्व मंडळींनी गडचिरोली पोलीस दलाचे आभार मानले आहेत.


REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA